## निशाणी क्रं.14 वर आदेश
## (सी.एन.आर. क्रंमाक MHLA150003672021)

सदरचा दावा वादी यांनी वाद मिळकती बाबत मालकी घोषीत करून निरंतर मनाई हुकुम मिळणे बाबत केलेला आहे व तो न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सदरचे प्रकरणामध्ये वादी यांनी दावा दाखल करतेवेळी दाव्यामधे टंकलीखीत करताना अनावधाने वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर असे नमुद केले होते. परंतू वाद मिळकतीचे खरे वर्णन गट नं.55/5 मधे 00 हेक्टर 82 आर असे आहे. त्यामुळे वादीने परिच्छेद क्र. 2 मध्ये वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर ऐवजी वाद मिळकतीचे वर्णन गट नं. 55/5 मधे 00 हेक्टर 82 आर अशी दुरूस्ती करावयाचा अर्ज नि.क्र.14 वर वादीने दिवाणी प्रक्रीया सहिता ऑर्डर 6 रूल 17 प्रमाणे देवून वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितलेली आहे.

02. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने असे नमुद केले आहे की, वादी यांनी दावा दाखल करतेवेळी दाव्यामधे टंकलीखीत करताना अनावधाने वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर असे नमुद केले होते. परंतू वाद मिळकतीचे खरे वर्णन गट नं.55/5 मधे 00 हेक्टर 82 आर असे आहे. त्यामुळे वादीने परिच्छेद क्र. 2 मध्ये वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर ऐवजी वाद मिळकतीचे वर्णन गट नं. 55/5 मधे 00 हेक्टर 82 आर अशी दुरूस्ती करण्याची परवानगी मागीतली आहे. सदरची दुरूस्ती केल्यास प्रस्तुत दाव्याच्या व अर्जाच्या मुळ स्वरूपात कोणत्याही प्रकारचा बदल अथवा प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसुन सदर दाव्याच्या न्याय निवाडयासाठी व गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यासाठी आवश्यक आहेत.

03. प्रतिवादीने नि.क्र.14 वर म्हणणे दाखल करून सदर अर्ज मंजुर करण्यास हरकत दर्शविली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

04. वादीचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे पाहिले. तसेच वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यानुसार खालील मुद्दे माझे विचाराधीन आले. सदर मुद्दे व त्यावरिल निश्कर्ष कारणांसहित मी, खालीलप्रमाणे नमुद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | वादी हे सिध्द करतो काय त्याने केलेल्या विनंतीनुसार तो दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास पात्र आहे काय ? | होय |
| 2. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. १ व २ करीता

05. वादीच्या अर्जातील कथनानुसार दाव्यातील वादपत्रामध्ये दुरूस्ती करावयाची आहे. सदर दुरूस्तीचे अवलोकन केले असता असे निर्दशनास येते की, वादीने दावा दाखल करतेवेळी दाव्यामधे टंकलीखीत करताना अनावधाने वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर असे नमुद केले होते. परंतू वाद मिळकतीचे खरे वर्णन गट नं.55/5 मधे 00 हेक्टर 82 आर असे आहे. त्यामुळे वादीने परिच्छेद क. 2 मध्ये वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 1 हेक्टर 00 आर ऐवजी वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 00 हेक्टर 82 आर अशी दुरूस्ती दुरूस्ती करण्याची परवानगी मागीतली आहे. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींचे म्हणने देण्यासाठी ठेवण्यात आला आहे. व सदर दाव्यामध्ये वाद मुद्दे काढण्यापुर्वी सदरचा अर्ज वादीने दिला आहे. सदरची दावा दुरूस्ती अर्जामध्ये वादीने जी दावा दुरूस्तीची मागणी केली आहे, ती वादपत्रामध्ये नमुद नाही व त्यांनी ती बाब म्हणजेच वाद मिळकतीचे वर्णन गट नं.55/5 मधे 00 हेक्टर 82 आर ऐवजी 1 हेक्टर 00 आर असे चुकुन अनावधानाने दावा टंकलीखीत करताना नमुद केली आहे. सदरचा दावा हा वाद मिळकती बाबत मालकी घोषीत करून निरंतर मनाई हुकुम मिळणे बाबत दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीला त्याच्या मागणीप्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही.

प्रतिवादीला दुरूस्त दाव्या संदर्भात त्याची लेखी कैफियत द्यावयाची संधी आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यात वादीच्या मागणीप्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुत दाव्यातील गुण–दोषावर न्यायनिर्णीत करण्यास मदतच होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. त्यामुळे मी वर नमुद मुद्या क्र.1 चे होकारार्थी निष्कर्ष नोंदवुन वर नमुद मुद्या क्र.2 बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

1. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

2. वादीने सदरच्या अर्जाप्रमाणे मागितलेली दुरुस्ती 14 दिवसाच्या आत करावी.

3. दावा दुरुस्ती केल्यानंतर वादीने दुरुस्त प्रत 14 दिवसाच्या आत सदर प्रकरणात हजर करावी. त्याचप्रमाणे प्रतिवादीं साठी सुध्दा दुरुस्त दाव्याच्या प्रती उपलब्ध करुन दयाव्यात.

**(आदेश खुल्या न्यायालयात वाचला).**

MANGESH SUBHASH LUNIYA

Digitally signed by MANGESH SUBHASH LUNIYA
Date: 2023.08.10 10:44:04 +0530

**दि. 09/08/2023**

**( एम.एस. लुनिया )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चाकुर**

CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D.F. file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Jr. Clark | : Santosh Sanjayrao Patil |
| Court Name | : M.S. Luniya, Jt.C.J.J.D., Chakur. |
| Order Date | : **09/08/2023** |
| Order signed by presiding officer on | : **09/08/2023** |
| Order uploaded on | : **09/08/2023** |